

## भुयारीकरणाला वेग

कुलाबा-वांद्रे-सीप्झ या मुंबईतील पहिल्या भुयारी मेट्रो मार्गाचे केवळ सहा महिन्यांत २१९२ मीटरपर्यंतच्या भुयाराचे काम पूर्ण झाले आहे. भुयार खोदण्यासाठी आणखी यंत्रे प्रकल्पस्थळी दाखल झाल्यानंतर सर्वच टप्प्यांवर भुयारीकरणाच्या कामाला सुरुवात होऊन प्रकल्पाला आणखी गती मिळेल.

➤वृत्त...५

# मेट्रोच्या भुयारीकरणाला वेग



म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई

कुलाबा-वांद्रे-सीप्झ या मुंबईतील पहिल्या भुयारी मेट्रो मार्गाचे केवळ सहा महिन्यांत २१९२ मीटरपर्यंतच्या भुयाराचे काम पूर्ण झाले आहे. भुयार खोदण्यासाठी आणखी यंत्रे प्रकल्पस्थळी दाखल झाल्यानंतर सर्वच टप्प्यावर भुयारीकरणाच्या कामाला सुरुवात होऊन प्रकल्पाला आणखी गती मिळेल.

३३.५ किमी लांबी असलेल्या या प्रकल्पाच्या भुयारीकरणासाठी मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनला १७ टनेल बोअरिंग यंत्राची (टीबीएम्स) आवश्यकता आहे. त्यापैकी ११ यंत्रे शहरात दाखल झाली आहेत. आतापर्यंत आठ यंत्रांद्वारे भुयारीकरणाचे काम करण्यात येत आहे. या यंत्रांना महाराष्ट्रातील सूर्या, वैतरणा, तानसा, कृष्णा, गोदावरी, तापी आणि वैनगंगा या नद्यांची नाव देण्यात आली आहेत.

मेट्रो-३ प्रकल्पाचे विविध टप्प्यांमध्ये भुयारीकरणाचे काम सुरू असून, त्या कामाचा तपशील पुढीलप्रमाणे :

- **आझाद मैदान** : टप्पा २मधील वैतरणा १ व २ टीबीएमद्वारे ग्रँट रोडपर्यंत ४.५ किमी भुयारीकरण करण्यात येणार आहे. त्यापैकी ४५० मीटर भुयारीकरण पूर्ण झाले आहे.
- **नयानगर** : टप्पा ४ अंतर्गत कृष्णा १ व २ या टीबीएमद्वारे दादर मेट्रो स्थानकापर्यंत २.५ किमी भुयारीकरण करण्यात येणार असून, त्यापैकी १००५ मीटर भुयारीकरण पूर्ण झाले आहे.
- **विद्यानगरी** : टप्पा ५ अंतर्गत आंतरदेशीय विमानतळ स्थानकापर्यंत २.९८ किमी भुयारीकरण करण्यात येणार आहे. सध्या या पॅकेज अंतर्गत ३४२ मीटर भुयारीकरण पूर्ण झाले आहे.

## कुलाबा-सीप्झ मेट्रोसाठी २ किमी काम पूर्ण



- **मरोळ नाका** : टप्पा ७ अंतर्गत २ टीबीएमद्वारे आंतरराष्ट्रीय विमानतळापर्यंतचे १.२ किमी भुयारीकरण करण्यात येणार आहे. या पॅकेजमध्ये सध्या वैनगंगा १ व २ या मशिनद्वारे ३९५ मीटर भुयारीकरण पूर्ण झाले आहे.
- कॉर्पोरेशनच्या व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे यांनी कामाच्या प्रगतीबाबत समाधान व्यक्त केले. 'आम्ही आठ टीबीएमद्वारे २००० मीटरपेक्षा अधिक भुयारीकरण पूर्ण केले असून, प्रकल्पाच्या दृष्टीने महत्त्वाचा टप्पा पूर्ण केला आहे. १५ टीबीएम्सची चाचणी पूर्ण झाली असून प्रकल्पाला आवश्यक असणाऱ्या उर्वरित टीबीएम्स जुलै अखेरपर्यंत दाखल होतील. त्यानंतर सर्व टप्प्यांमध्ये भुयारीकरणास प्रारंभ होणे अपेक्षित आहे. यामुळे कामाला अधिक गती प्राप्त होईल', असे सांगताना त्यांनी मुंबईकरांचे आभार मानले.